आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 08/10/2026 | METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 213 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून राज्यस्तरीय 'लिव्हिंग लॅब' विकसित!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : महाराष्ट्राच्या 'सर्वांसाठी आरोग्य' या ध्येयाला पूरक ठरणारी आरोग्य नवोन्मेष आणि गुणवत्ता सुधारणेसाठीची राज्यस्तरीय 'लिव्हिंग लॅब' विकसित होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून आरोग्य सुविधांचा दर्जा आणि गुणवत्ता मानकांचे पालन सुधारण्यासह राज्यातील नागरिकांसाठी कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर सुद्धा भर देण्यात येणार आहे.**



स्थानिक आरोग्यविषयक प्राधान्यक्रम निश्चित करणे, समुदायांसोबत उद्देशानुरूप उपाय तयार करणे आणि प्रत्यक्ष आरोग्य व्यवस्थेत नव्या पद्धतींची चाचणी घेणे, हा या व्यासपीठाचा उद्देश आहे. शासन, आरोग्यसेवा प्रदाते, खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था, नवोन्मेषक आणि विकास भागीदारांचे अनुभव व क्षमता एका सामायिक व्यासपीठावर आणून सध्याची आरोग्य व्यवस्था आणि उपचार मार्ग अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न 'लिव्हिंग लॅब'च्या माध्यमातून करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा प्रयत्न आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आरोग्य, डेटा आणि 'प्रिसिजन हेल्थ'सह नवोन्मेष व तंत्रज्ञानाच्या क्षमतांचाही यासाठी उपयोग केला जाणार आहे.खासगी आरोग्य क्षेत्राची व्याप्ती व क्षमता सार्वजनिक आरोग्याच्या प्राधान्यक्रमांशी जोडणे, ही या उपक्रमातील महत्त्वाची संधी आहे. विविध भागधारकांच्या सहभागातून स्थानिक गरजांना प्रतिसाद देणारे व्यवहार्य, परवडणारे आणि सुलभ उपाय विकसित करता येतील. यशस्वी उपायांचा महाराष्ट्रासह अन्य ठिकाणीही विस्तार करण्याची क्षमता तपासली जाईल. उपक्रमाच्या पुढील टप्प्यांत समुदायाच्या आरोग्यविषयक गरजांशी निगडित स्थानिक कौशल्यविकास, रोजगार आणि उद्योगनिर्मितीच्या संधींचाही शोध घेतला जाणार आहे.केवळ नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याऐवजी दुर्गम व आरोग्यसेवेपासून वंचित घटकांसह प्रत्येक नागरिकापर्यंत नवोन्मेष पोहोचविण्यावर या संकल्पनेत भर आहे. शासन, समुदाय, नवोन्मेषक आणि भागीदारांच्या सहभागातून परिणामकारक उपायांची चाचणी, त्यातून मिळणाऱ्या अनुभवांचे वेगाने विश्लेषण आणि आरोग्यसेवेची गुणवत्ता व समानता सुधारणाऱ्या उपायांचा व्यापक विस्तार करण्याचे उद्दिष्ट आहे.पुरावेनिर्मिती आणि सहकार्याचे व्यासपीठ म्हणून 'लिव्हिंग लॅब' विकसित केली जाणार आहे. समुदायाच्या गरजा आणि स्थानिक मालकी या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी ठेवून नवोन्मेष, आरोग्य व्यवस्था आणि प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या घटकांमधील समन्वय अधिक मजबूत केला जाईल.

# एमपीएससी आंदोलनाची उच्च न्यायालयाकडून दखल!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेतील कथित अनियमिततेविरोधात पुण्यात विविध ठिकाणी सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी गंभीर दखल घेतली. विद्यार्थ्यांच्या मागण्या रास्त असून त्यांच्या हिताची न्यायालयाला काळजी आहे. मात्र, विविध ठिकाणी आंदोलन करून पुणेकरांची गैरसोय करू नये, असे आवाहन न्यायालयाने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना केले.**



मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वेत सेठना यांच्या खंडपीठासमोर एमपीएससी परीक्षांबाबत पुण्यात सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर दाखल याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने विद्यार्थ्यांना आंदोलनासोबतच अभ्यासाकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या हिताची सर्वतोपरी काळजी घेतली जाईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. सरकारी नोकरभरतीसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षा निष्पक्षपणे, पारदर्शक पद्धतीने आणि कोणत्याही गैरप्रकारांशिवाय पार पडतील, याची खात्री करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

एमपीएससीच्या परीक्षांबाबत विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी सरकारने प्रामाणिक प्रयत्न करावेत, असेही खंडपीठाने नमूद केले.

दरम्यान, आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनी केलेल्या मागण्यांबाबत आतापर्यंत सरकारने कोणते प्रयत्न केले आणि कोणती कार्यवाही केली, याबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

# बालस्वरांपासून अजय-अतुलच्या सुरांपर्यंत रंगली अभिजात मराठीची सांगीतिक मैफल

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहांतर्गत शहरातील महापालिकेच्या विविध सभागृहांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून आचार्य अत्रे रंगमंदिर आणि नटसम्राट निळू फुले रंगमंदिर, सांगवी येथे बालगीत, नृत्याविष्कार तसेच मराठी गीतांच्या सांगीतिक मैफलीचे आयोजन करण्यात आले. बालकलाकारांच्या निरागस सादरीकरणापासून अजय-अतुल यांच्या लोकप्रिय गीतांच्या सुरांपर्यंत रंगलेल्या या कार्यक्रमांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



आचार्य अत्रे रंगमंदिर येथे भारती न्यायाधीश व त्यांच्या सहकाऱ्यांनी बालगीतांचा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाची मूळ संकल्पना विजय न्यायाधीश यांची होती. बालकलाकारांनी विविध भक्तीगीते आणि बालगीतांवर नृत्याविष्कार सादर करत उपस्थितांची मने जिंकली. ध्वनी गुप्ता, शौर्यवी मांडवगडे आणि ईरा चायनाकवा या बालकलाकारांनी आपल्या बहारदार सादरीकरणाने कार्यक्रमात विशेष रंग भरला. भारती न्यायाधीश यांनीही आपल्या सुरेल आवाजात गाण्यांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

'या हो या गणपती बाप्पा या हो या', 'कावळे दादा काव काव', 'आमच्या घरची मनीमाऊ', 'कोंबडीने शिकवले पिल्लाला', 'डूबी डूबी डम डम' आदी बालगीतांवरील सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. बालकलाकारांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमस्थळी आनंदमयी वातावरण निर्माण झाले.

यावेळी प्रशासन अधिकारी दत्ता सूर्यवंशी, नेहरूनगर येथील महानगरपालिका उर्दू शाळेतील शिक्षक रोहिणी हरकारे, मनीषा प्रसाद, सालेहा तांबोळी आणि मोहम्मद सय्यद तसेच नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर केदारी यांनी केले, तर आभार प्रशासन अधिकारी दत्ता सूर्यवंशी यांनी मानले.दरम्यान, नटसम्राट निळू फुले रंगमंदिर, सांगवी येथे अमीर शेख व चंद्रकांत नगरकर प्रस्तुत 'सदाबहार अजय-अतुल' या विशेष मराठी गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अजय-अतुल यांच्या लोकप्रिय गीतांची सुरेल मेजवानी, बहारदार लावणीचे सादरीकरण, प्रभावी गायन आणि दमदार वाद्यवृंद यामुळे ही सांगीतिक मैफल रंगतदार ठरली. रसिकांनी टाळ्यांचा कडकडाट आणि उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांचा उत्साह वाढवला.

# पुणे नवरात्रौ महोत्सवाचे होणार मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**कला, संस्कृती, गायन, वादन, भजन, नृत्य, संगीत यांचा मनोहारी संगम असणारा पुणे नवरात्रौ महोत्सवाचे यंदा 32वे वर्ष दिमाखात साजरे करीत असून, महोत्सवाचे उद्घाटन रविवार, दि. 11 ऑक्टोंबर रोजी सायंकाळी 5.00 वाजता महाराष्ट्राचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते श्री. गणेश कला क्रीडा रंगमंच येथे संपन्न होईल.**




याप्रसंगी केंद्रीय नागरी हवाई उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहळ, ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व माजी आमदार उल्हास पवार, महापौर मंजुषा नागपुरे, माजी उपसभापती आमदार डॉ नीलम गोऱ्हे, आ. डॉ. विश्वजीत कदम, आ. विजय शिवतारे, युवसेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत तसेच अनेक राजकीय नेते व पदाधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहतील अशी माहिती पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक अध्यक्ष आबा बागुल यांनी पत्रकार परिषदेत दिली. या उद्घाटन सोहळ्यात सिनेतारका भार्गवी चिरमुले, वैशाली जाधव, सानिया चौधरी, श्वेता परदेशी, झेबा शेख, डॉ. सुखदा खांडगे, मृण्मयी मोघे, आयली घिया, ऋजुता जुन्नरकर यांची विशेष उपस्थिती लक्षवेधी असेल. या महोत्सवाचे सर्व कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य असतात. अशी माहिती पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक अध्यक्ष व माजी उपमहापौर आबा बागुल यांनी पत्रकार परिषदेत सांगितली.रविवार, दि. 11 ऑक्टोंबर घटस्थापनेच्या दिवशी शिवदर्शन येथील श्री. लक्ष्मीमाता मंदिरात आबा बागुल व सौ. जयश्री बागुल यांच्या हस्ते सकाळी 9.18 मि. या शुभमुहूर्तावर विधिवत घटस्थापना केली जाईल. या उद्घाटन सोहळ्यात विविध क्षेत्रात सातत्याने योगदान देणाऱ्या व्यक्तींना जीवन गौरव पुरस्काराने' सन्मानित केले जाते. यंदाच्या पुरस्कारचे मानकरी डॉ. संजय दुधाने (क्रीडा), डॉ. ऋतुपर्ण शिंदे (वैद्यकीय), डॉ. विजय फळणीकर (सामाजिक), निकिता मोघे (सांस्कृतिक) आणि वैशाली समसापूरकर (लोक कलावंत) यांना या पुरस्काराने गौरवले जाईल असे आबा बागुल यांनी सांगितले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 08/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# बिअरच्या बाटल्यांनी तरुणावर हल्ला

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**तळवडे : दुचाकी कुठे आहे, अशी विचारणा केल्याच्या कारणावरून दोन तरुणांनी एका इलेक्ट्रिशियनवर बिअरच्या रिकाम्या बाटल्यांनी हल्ला करून जखमी केल्याची घटना तळवडे येथील कंटेनमेंट एरिया परिसरात घडली.**



याप्रकरणी यासिन इद्रिस शेख (वय 23, व्यवसाय इलेक्ट्रिशियन, रा. एकता चौक, श्रमिक हाउसिंग सोसायटी, रुपीनगर, तळवडे) यांनी देहूरोड पोलिसांत फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी सोन्या वानखेडे (वय अंदाजे 21) आणि ओमकार चव्हाण (वय 21), दोघे रा. रुपीनगर, तळवडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.4 ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे 1.45 वाजता माळावर मोकळ्या मैदानात, मोठ्या ज्ञानदीप शाळेजवळ, कंटेनमेंट एरिया येथे फिर्यादी उभे होते. त्यावेळी आरोपींनी 'तुमची दुचाकी कुठे आहे?' अशी विचारणा केली.

त्यानंतर दोघांनी पाठीमागून येऊन फिर्यादीच्या डोक्यावर व उजव्या कानावर बिअरच्या रिकाम्या काचेच्या बाटल्या मारल्या.

या हल्ल्यात डोक्यावर चार आणि उजव्या कानाजवळ तीन टाके लागल्याचे फिर्यादीने सांगितले.

आरोपींनी शिवीगाळ करून या भांडणाबाबत कोणाला सांगितल्यास पुन्हा मारहाण करण्याची धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

# रहाटणीत लोखंडी सुरा घेऊन फिरणाऱ्यावर कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**रहाटणी : पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत शस्त्र बाळगण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक आदेश लागू असताना लोखंडी सुरा बाळगल्याप्रकरणी काळेवाडी पोलिसांनी एका व्यक्तीवर कारवाई केली.**



याप्रकरणी भीमाशंकर अंबाजी भोसले, पोलिस शिपाई पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी सयाजी दत्ता सालंकमवाड (वय 40, रा. गणेश नखाते यांच्या भाड्याच्या खोलीत, मथुरा कॉलनी, राहटणी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, 5 ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे 12.05 वाजता राजगड कॉलनीसमोर, नखाते चौकाजवळ, राहटणी येथे आरोपीकडे लोखंडी सुरा आढळून आला.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत दंगा अथवा शस्त्रांचा वापर करून शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बाळगण्यास अथवा जवळ ठेवण्यास मनाई असतानाही आरोपीने आदेशाचा भंग करून लोखंडी सुरा बाळगल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 08/10/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# भाजपाच्या 'सेवा ज्योती यात्रे'तून विकसित भारताचा संकल्प

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने आयोजित 'विकसित भारत संकल्प सभा व सेवा ज्योती यात्रा' भोसरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राष्ट्रविकास, जनसेवा आणि संघटनबळ अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करत भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी 'विकसित भारत' संकल्पनेचा जयघोष केला.**



भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या संकल्प सभा व यात्रेला पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सेवा, सुशासन आणि विकास या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकासाभिमुख योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासह राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. संघटन अधिक सक्षम करण्यासोबतच केंद्र आणि राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेला जनसहभाग आणि कार्यकर्त्यांच्या सक्रिय योगदानाची जोड देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमास आमदार शंकर जगताप, उमाताई खापरे, अमित गोरखे, महापौर रवी लांडगे, गटनेते प्रशांत शितोळे, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, विकास डोळस, मधुकर बच्चे, संजय पटनी, वैशाली खाड्ये, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, नवनगर विकास प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, दक्षिण भारतीय आघाडी प्रभारी राजेश पिल्ले यांच्यासह सर्व मंडलाध्यक्ष, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'सेवा ज्योती यात्रा'च्या माध्यमातून राष्ट्रसेवा, जनसेवा आणि विकासाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती आणि उत्स्फूर्त सहभागामुळे भोसरी परिसरात भाजपाच्या संघटनशक्तीचे दर्शन घडले.

'संकल्प विकासाचा, ज्योत सेवेची आणि ध्यास विकसित भारताचा' या भावनेतून आयोजित करण्यात आलेली ही यात्रा आगामी काळात संघटन अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा देणारी ठरली.

# प्रेक्षकांच्या तुडुंब गर्दीत हास्याचा 'ऑल दि बेस्ट'

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: हास्याचे क्षण, मैत्रीची ताकद, बदलती नाती आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न... अशा विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या दोन नाटकांनी मंगळवारी चिंचवडच्या प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात रंगत आणली. 'ऑल दि बेस्ट' या विनोदी नाटकाने प्रेक्षकांना मनमुराद हसविले, तर 'वरवरचे वधू-वर'ने आजच्या पिढीच्या प्रेम आणि विवाहाकडे पाहण्याच्या बदलत्या दृष्टिकोनाचा विनोदी पद्धतीने वेध घेतला. दोन्ही प्रयोगांना नाट्यरसिकांची तुफान गर्दी उसळली होती. नाट्यरसिकांचे एवढे प्रेम पाहून कलाकारही भारावून गेले.**



मराठी भाषा, साहित्य, कला आणि संस्कृतीचा परिचय नागरिकांना व्हावा, तसेच मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार व्हावा, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 3 ते 9 ऑक्टोबरदरम्यान 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली सप्ताहाचे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.सप्ताहाच्या निमित्ताने मंगळवारी दुपारच्या सत्रात देवेंद्र पेम लिखित 'ऑल द बेस्ट' या नाटकाचा प्रयोग झाला.

मयुरेश पेम, मनमित पेम आणि निखिल चव्हाण यांच्या अभिनयाने नाटकाला चांगली रंगत आली. विनोदी प्रसंग आणि संवादांमुळे प्रेक्षकांना हसता हसता आनंद मिळाला. त्याचबरोबर शारीरिक अक्षमतेवर मात करून आत्मविश्वासाने जगण्याचा सकारात्मक दृष्टिकोन नाटकातून मांडण्यात आला. मैत्री आणि एकमेकांना साथ देण्याचे महत्त्वही नाटकाच्या माध्यमातून सांगण्यात आले. कलाकारांच्या अभिनयाला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. या प्रयोगासाठी प्रेक्षागृह पूर्णपणे भरले होते.

सायंकाळच्या सत्रात विराज कुलकर्णी लिखित-दिग्दर्शित 'वरवरचे वधू-वर' या नाटकाचा प्रयोग झाला.

सुव्रत जोशी, सखी गोखले आणि सूरज पारसनीस यांच्या अभिनयाने सजलेल्या या नाटकातून आजची पिढी प्रेम आणि लग्नाकडे कशी पाहते, याचे चित्रण करण्यात आले. लग्नाचा निर्णय घेताना तरुण-तरुणींच्या

मनात असलेला संभ्रम, नात्यांमधील अपेक्षा आणि 'कमिटमेंट' स्वीकारताना येणाऱ्या अडचणी यावर नाटकातून विनोदी पद्धतीने भाष्य करण्यात आले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968